**BDC LIBRARY**
**New Paper Clipping**
**A.Y. 2023-2024**

# हॉटेल मॅनेजमेंटद्वारे विद्यार्थ्यांना नवीन करिअरची संधी : प्रा. चेतन सावंत

**पाटण,** दि. २ : मुलांमधील सुप्त गुणांना चालना देणारी करिअरची नवीन दिशा १० वी, १२ वी, पदवी उत्तीर्ण झाल्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना आपल्यातील व पालकांना आंपल्या पाल्यातील सुप्त गुण दिसू लागतात. त्याच गुणांना ओळखून त्याचे रूपांतर त्यांच्या करिअरच्यादृष्टीने कसे फायदेशीर ठरेल याचा विचार करण्याची वेळ आली आहे. हॉटेल क्षेत्रात करिअर ही सर्व विद्यार्थी व पालकांसाठी खूप अनोळखी अशी नवी दिशा आहे. याची योग्य ओळख करून द्यावयाचे कार्य कोयना एज्युकेशन सोसायटीचे इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट पाटण करत असल्याचे प्राचार्य चेतन सावंत यांनी सांगितले.

प्राचार्य सावंत म्हणाले, हॉटेल मॅनेजमेंट म्हणजे नक्की काय असते, हा प्रश्न सर्वांना पडतो. हॉटेलमध्ये कार्यरत असणारे महत्वाचे चार विभाग म्हणजेच फूड प्रोडक्शन, फूड अँड बेव्हरेज सर्व्हिस, हाऊसकिपींग व फ्रंट ऑफिस या विभागाचा सखोल अभ्यास व प्रात्यक्षिक म्हणजे हॉटेल मॅनेजमेंट होय. हॉटेल मॅनेजमेंटचे शिक्षण घेण्यासाठी पुणे, मुंबई यासारख्या मोठ्या शहरात जावे लागते. हेच शिक्षण आपल्या भागातील विद्यार्थ्यांना माफक फी मध्ये आपल्या शहरात राहून घेता यावे यासाठी संस्थेने हा कोर्स आपल्या कॉलेजमध्ये सुरु केला आहे.

सातारा जिल्ह्यातील प्रथम आयएसओ (९००१:२०१५) मानांकित कॉलेज याठिकाणी आहे. प्रशस्त कॉलेज कॅम्पस, मुला व मुलींसाठी स्वतंत्र हॉस्टेल, डिजिटल क्लास रूम, ट्रेनिंग किचन व बेकरी, ट्रेनिंग रेस्टॉरंट आणि बार, रिसेप्शन, बँकवेट हॉल, हॉउसकिपींग रूम तसेच ओपन जिम, प्ले ग्राउंड, ऑडिटोरिअम हॉल आदी सुविधा देखील कॉलेज अंतर्गत देण्यात आलेल्या आहेत. कॉलेज अंतर्गत महाराष्ट्र शासन मानांकित सर्टिफिकेट व डिप्लोमा कोर्सेस चालविले जातात. कोर्स पूर्ण झाल्यानंतर कॉलेज मार्फत ट्रेनिंग व जॉब प्लेसमेंटची शंभर टक्के हमी दिली जाते. विद्यार्थ्यांसाठी उत्तम शैक्षणिक वातावरण, अनुभवी शिक्षक वर्ग, सर्वोत्तम प्लेसमेंट, भरपूर प्रॅक्टिकल्स अशा सर्व सोयींनी युक्त असे हॉटेल मॅनेजमेंटचे कॉलेज आहे.

अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना ट्रेनिंग व जॉब प्लेसमेंट हे कॉलेज मार्फत दिले जाते. पुणे, मुंबई, बेंगलोर, चेन्नई ,हैदराबाद, गुजरात, गोवा, महाबळेश्वर, लोणावळा, इंदोर याठिकाणी फाईव्ह स्टार, फोर स्टार हॉटेल्स, रिसॉर्ट, फाईन डायनिंग रेस्टॉरंट याठिकाणी विद्यार्थ्यांना ट्रेनिंग व जॉब प्लेसमेंट दिले जाते. एवढेच नव्हे तर परदेशात ट्रेनिंग व जॉब प्लेसमेंटची संधी देखील विद्यार्थ्यांना कॉलेजमार्फत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ प्रवेश प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली असून मोजकेच प्रवेश शिल्लक आहेत.

तरी इच्छुकांनी बाळासाहेब देसाई कॉलेज कॅम्पस पाटण याठिकाणी संपर्क साधावा, असे आवाहनही प्राचार्य चेतन सावंत यांनी केले आहे.